Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Volume-4 | Issue-3 | April-2014 Available online at www. isrj.net

# डॉ. बाबासाहेबाचे शेती विषयक विचार

**शालीग्राम गोपाळराव शिंदे,**

इतिहास विभाग प्रमुख, नागनाथ महविद्यालय, औंढा (नागनाथ), ता. औंढा (नागनाथ), जि. हिंगोली

**सारांश** : डॉ. आंबेडकराने शेती हा व्यवसाय पुर्नजीवीत करण्यासाठी काही उपाय सुचविले आहेत. त्यांच्या मते -

शेती वरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी शेतीवर आधारीत उद्योग धंदयाची निर्मिती करावी, औद्योगिकरणाला गती दयावी.शेतीवर आधारित उद्योग आणि इतर पुरक उद्योग शेती व्यवसाया बरोबरच वाढविले तरच आपोआपच शेती व्यवसायाचे महत्व वाढेल. शेती-उत्पादंनाची किंमतही वाढेल हयामुळे होणारा फायदा शेतकरी, उद्योजक यांना मिळेल व मोठया प्रमाणात ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध होतील. परिणामी ग्रामीण भागातील मजूर व शेत मजूर हा शहराकडे आकर्षीत होणार नाही. त्याचबरोबर जमीन धारणेच्या एकत्रीकरणामुळे शेतीवर आधारीत उद्योगधंदयाची वाढ करुन शासनाने औद्योगिकरणाला प्रोत्साहन दयावे व ग्रामीण भागात उद्योजक निर्माण करावेत म्हणजेच भारतातील शेतीचे प्रश्न सोडविणे सहज शक्य होतील व शेती वरील अतिरिक्त लोकसंख्येचा भारही कमी होण्यास मदत होईल. उत्पादनावर आधारभूत किम्मती निर्धारित होतील. परिणामी शेती आर्थिक संकटातून मुक्त होईल व शेतकरी खऱ्या अर्थाने बळीराज्य निर्माण करेल.

**प्रस्तावना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय घटनेचे शिल्पकार, प्रख्यात कायदेतज्ज्ञ, दलितांचे कैवारी, लोकशाहीचे पुरस्कर्ते, पत्रकार, संपादक, प्रखर राष्ट्रवादी, हिंदु संस्कृतीचे महान अभ्यासक, बौध्द धर्म प्रवर्तक इत्यादी नात्याने ते सुपरिचित आहेत परंतु ते एक निष्णात अर्थशास्त्रज्ञ होते याची अनेकांना कल्पना नसण्याचीच शक्यता जास्त आहे परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर सैध्दांतिक व व्यावहारिक आर्थिक प्रश्नावर अत्यंत दर्जेदार अर्थशास्त्रीय लिखान केले आहे त्यांचे हे लिखान देशाच्या काही आर्थिक प्रश्नांवर आजही प्रकाश पाडू शकते कारण भारताची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी काय करणे आवश्यक आहे या संबंधी त्यांनी सखोल चिंतन करुन आपली मते मांडलेली होती.[(१)]

डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे आर्थिक विचार हे प्रामुख्याने त्यांनी लिहिलेले विविध प्रबंध, विविध समित्या समोर दिलेल्या साक्षी, केलेली निवेदने, लिहिलेल्या पुस्तिका, वर्तमानपत्रे, केलेली भाषणे यातून पहावयास मिळतात.[(२)]

भारत हा कृषिप्रधान देश म्हणूनच आजही ओळखला जातो. भारतीय अर्थ व्यवस्थेचा शेती हा पाया असून ग्रामीण अर्थ व्यवस्थेची सर्व मदार ही शेतीवरच आहे त्यामुळे भारतातील शेती कशाप्रकारे आहे, त्या शेतीमधून कोणत्या प्रकारचे पीक घेतल` जावे या विषयी शास्त्रीय आधारावर चिकित्सा होणे महत्वाचे ठरते. अशा विचारांचे डॉ. आंबेडकर होते.[(३)]

**भारतीय शेतीच्या धारणा क्षेत्राचा प्रश्न :**

शेती हा भारतीय अर्थ व्यवस्थेचा कणा आहे पण तीच मागसलेली आहे. त्यातल्या त्यात विभाजन व अपखंडत हा येथील कळीचा मुद्दा आहे. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर "भारतातील अल्पभूधारण क्षेत्रे व त्यातील उपाय" या नावाचा शोधनिबंध "द जनरल ऑफ इंडियन एक्यानामेक्स सोसायटी" च्या अंकात इ.स. १९१८ साली प्रसिध्द केला होता.[४]

या शोधनिबंधातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेती विषयक निर्माण केलेल्या प्रश्नांची उकल पंच्चानंव (९५) वर्षापूर्वी जेवढे मार्गदर्शन होते त्यापेक्षाही आज अधिक पटीने मार्गदर्शक ठरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते विभाजन अपखंडन व अल्पधारणक्षेत्र ही भारतीय शेतीची अत्यंत गंभीर व भेडसावणारी समस्या आहे. या संदर्भात डॉ. आंबेडकरांनी तीन प्रश्न उभे केले आहेत.

१)जमिनीच्या विभाजन व अपखंडनामुळे साधन संपत्तीच्या कार्यक्षम पध्दतीने वापर होत नाही तरी पण विभाजन व अपखंडन का घडून येते.

२)मोठे धारणक्षेत्र कार्यक्षम व लहान धारणक्षैत्र अकार्यक्षम असते काय.

३)विभाजन व अपखंडनामुळे निर्माण झालेल्या समस्येवर उपाय कोणते.[५]

**अल्पभुधारक शेती** :

भारतामध्ये अल्पभूधारक मोठया प्रमाणावर आहेत. एवढेच नव्हे तर जमिनीचे लहान लहान तुकडे मोठया प्रमाणावर विखूरलेले आहेत.[६] अल्पभूधारकतेमुळे शेती व्यवसायाला आणि शेतकऱ्यांला विविध समस्यांना तोंड दयावे लागत आहे कारण जमीनीवर पडत असलेला प्रचंड लोकसंख्येचा भार हेच त्याचे मुख्य कारण आहे. शेती अजिबात नसण्यापेक्षा लहान का असेना पण जमीनीचा तुकडा आपल्या मालकीचा असावा अशी लोकांची धारणा असते.[७]

**वारसा हक्काचा कायदा** :

हा कायदा शेतीवर वारसा हक्कच प्रस्थापित करीत नाही तर जमिनीचे कितीही लहान लहान तुकडे होवोत, वारसाला त्याच्या हक्का प्रमाणे जमीन मिळालीच पाहिजे अशी तरतूद आहे त्यामूळे अल्पभूधारक निर्माण होतात. हयावर उपाय म्हणून आंबेडकरांनी जमीनीचे एकत्रीकरण सुचविले आहे.

१) स्वंयस्फूर्तीने जमीनीचे देवाणघेवाण अथवा खरेदी-विक्री व्हावी ज्यामुळे जमीनीचे लहान लहान तुकडे एकत्रित येतील.
२) लहान लहान तुकडे कोणत्याही कारणामुळे होत असतील तर त्या जमीनीच्या विक्रीवर /देवाण घेवानीवर बंधने घालावीत.
३) शेजारी असलेल्या जमीन मालकालाच जमीन विकत घेण्याचा हक्क अधिकार असावा.
४) आवश्यकता वाटल्यास शेतीचे सक्तीचे एकत्रीकरण करावे.

**खोती पध्दत** :

काही भागामध्ये जमीनीचा शेतसारा गोळा करण्या करिता शासनाने खोताची नियुक्ती केली असे. जमीनीतून उत्पन्नाचा अर्धा भाग व पिकांचा १/३ भाग खोताने कुळाकडून वसूल करावा अशी पध्दत होती. खोत हे शेतकऱ्यांनावर अन्याय, अत्याचार व जुलुम करत असत व शेतकऱ्यांना वेठीस धरत असत म्हणून डॉ. आंबेडकरांनी १७ सष्टेंबर १९३७ रोजी मुंबई कायदे मंडळात खोती पध्दती रद्द करण्याचे विधेयक मांडले. डॉ. आंबेडकरांचे "खोती अंताचे विधेयक" म्हणजे जमीन सुधारणा विषयक कायदयाची अंमलबजावणी होय."[८]

**सामुदायिक शेती** :

सरकारने लागवडीसाठी नसलेली जमीन यासाठी द्यावी व ती भूमीहिनात हस्तांतरीत करावी. बहूतेक अस्पृश्य हे भूमिहिन शेतमजूर असल्याने कूळ कायदयाचा त्यांना काहीच फायदा नाही. केवळ सामुहिक शेतीच त्यांना मदत करु शकते कारण ही पध्दत लोकशाही तत्त्वावर आधारित असून हीच एक अशी पध्दत आहे की, जिच्यामध्ये उत्पादकता व कार्यक्षमता कायम राहून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे परिवर्तन करणे शक्य होते. एवढेच नव्हे तर सामाजिक अन्याय व शोषण यांना थारा न देणारी ही पध्दत आहे.[९]

हया पध्दतीचा स्वीकार केल्यामूळे, मोठे शेतकरी, शेतमजूर, कूळ इत्यादी वर्गच शिल्लक राहणार नाहीत. पर्यायाने ग्रामीण विकासा बरोबरच समाज, समता प्रस्थापित होईल असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

**शेत मजूर** :

शेत मजूरासंबंधी डॉ. आंबेडकर म्हणतात. भारतामध्ये रिकामा आणि निरुपयोगी भांडवल हे दोन महत्वाचे प्रश्न आहेत. हे दोन्ही प्रश्न एकमेकां पासून भिन्न आहेत कारण भांडवल नुसते असते तर मजूर मात्र स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी झगडत असतो.

**संदर्भ ग्रंथ सुची**

१. प्रा. सोमवंशी बी.सी. - अर्थशास्त्रज्ञ, प्रा. बी. आर. आंबेडकर,आनंद प्रकाशन औरंगाबाद, पृ. क्र. ०७.
२. संपादक प्राचार्य टि.ए. गवळी, व डॉ. पी. ए. गळवी, सुधीर गव्हाणे,बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रकाशन सौ.नंदिनी क. गवळी, कोल्हापुर, पृ. २६६.
३. प्रा. ए.आर. रायखेलकर- आर्थिक विचारांचा इतिहास, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ. २७८.
४. प्रा.पी.आर. कुमानाचे- अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृ. १५३.
५. संपादक- प्रा.डॉ. जे. एफ. पाटील - आर्थिक विचारांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ. ३०२.
६. डॉ. बी.डी. कुलकर्णी - आर्थिक विचार व विचारवंत डॉ. एस.व्ही. ढमढेरे डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पृ. २५१.
७. प्रा. डॉ.बी.डी. इंगळे - आर्थिक विचारांचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातुर, पृ. १६२.